सं.फौ.ख.क्र.१६६/२०२३
सरकार वि.नंदलाल
नि.क्र.११ च्या खाली

साक्षीदार क्र **०३** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–सुमित भाऊराव डांगे
वय ३४ वर्ष, व्यवसाय–नोकरी
राह.खातखेडा, ता.उमरेड, जि.नागपूर.

**सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत**

१. पोलिसांनी मला पंचनामा करण्याकामी समन्सपत्र दिले नव्हते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही सहीपुरता **निशाणी क्र.१७** देण्यात आला. मी घटनास्थळावर गेलो होतो. पोलिसांनी सही करा असे म्हटले व मी सही केली. आता मला पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. सहीला **निशानि क्र.१८** देण्यात आले. आता मला फोटो दाखविण्यात आला त्यामध्ये माझा फोटो आहे. त्याला यापुर्वीच **आर्टीकल अ** देण्यात आले.

**सदर साक्षीदार अभियोग पक्षास कोणत्याही मुद्दयावर सहकार्य करीत नसल्याने त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता, परवानगी देण्यात येते.**

२. मी सालेभट्टी ग्रामपंचायतमध्ये पाणीपुरवठा कर्मचारी आहे. मी तेथे दहा वर्षापासुन कार्यरत आहे. सदर कर्तव्य करत असतांना मला काही दस्तांवर सह्या कराव्या लागते. मी सदर दस्त वाचुन घेतो व खात्री करून त्यानंतर सही करावी किंवा कसे हे ठरवुन सही करतो. मी समन्सपत्र वाचुन पाहिले नव्हते कारण मी गडबडीत होतो. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी मला समन्सपत्र दिले होते व वाचुन समजुनच मी त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर मी वाचुन समजुन नंतर त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला फसविण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास संपला.**

**आरोपीतर्फे ॲड.श्री.पी.एच.रघुते यांच्यातर्फे उलटतपास सुरू.**

३. हे म्हणणे खरे आहे की, मी पोलिसांच्या सांगण्यावरून सह्या केल्या. सदर सह्या कशाच्या संदर्भात केल्या ते मला माहिती नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि.१८/०८/२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड